01305

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

## सत्रांत परीक्षा

## दिसम्बर , 2010

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*समय : 2 घण्टे* *अधिकतम अंक : 50*

---

1. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : 10

   (a) हिंसाचाराने प्रश्न सुटत नाहीत!

   (b) मतदारांचे प्रबोधन

   (c) उपवास : धार्मिक, सामाजिक आणि वैयक्तिक

   (d) माझे शिक्षक

2. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या : 8

   (a) 'वळीव' या कथेत लेखकाने वाऱ्याचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे?

   (b) 'कातरवेळ' ही कथा अक्का सांगते आहे अशी कल्पना करून कथेतील एखादा प्रसंग लिहा.

   (c) पुढील शब्दांची फोड करा :

   पडतासलेला, बसतासे, जातास ताना,

   (d) पारध संस्कृती आणि कलासंस्कृती यांच्यातील फरक स्पष्ट करा.

3. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(a) विनोदाचे प्रकार कोणते? चिं.वि. जोशी यांच्या लेखनात ते कसे आढळतात?

(b) वृक्षवल्ली, वनचरे, पक्षी यांच्याशी तुकारामांचे कोणते भावसंबंध जुळलेले होते?

(c) बा.सी. मर्ढेकरांनी कोळसेवाल्याचे वर्णन कसे केले आहे?

(d) 'आम्ही कोण' या कवितेच्या भावार्थाचा सारांश लिहा.

4. खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** विषयांवर टीपा लिहा : 6

(a) प्रल्हादच्या बालपणीच्या आठवणींचे स्वरूप

(b) अक्कावर माया करणारी माणसे

(c) संत तुकारामांच्या अभंगाचे काव्यरूप

(d) एकांकिका

5. (a) क्रियापदांचे प्रकार सांगा 2

(b) खालीलपैकी कोणत्याही तीन पूर्वपदांचा उपयोग करून ***प्रत्येकी तीन*** नकारात्मक शब्द तयार करा : 3

अ, अन्, ना, न, नि

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा. 3

(a) अकलेचे दिवाळे निघणे

(b) जशास तसे

(c) हतबुद्ध होणे

(d) चटावरले श्राद्ध

(e) टेंभा मिरवणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) करून करून भागली, देवपूजेला लागली.

(b) फट् म्हणता ब्रह्महत्या.

(c) कावळ्याच्या शापाने गाय मरत नसते.

(d) आई जेवू घालेना, बाप भीक मागू देईना.

(e) आपलेच दात आणि आपलेच ओठ.

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर लिहा : 4

(a) जातीची हरळी काढण्यासाठी, अज्ञान दूर करण्यासाठी आणि सामुदायिक जीवन प्रेमाने जगण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी काय केले ?

(b) लोकसंख्यावाढ, प्रदूषण आणि संहारक अण्वस्त्रे यांमुळे मानवसमाज कसा चिंताग्रस्त झालेला आहे, ते सांगा ?

(c) अक्षर वाङ्मयाचे मूल्य व महत्त्व कशात आहे ?

(d) बालगंधर्वांच्या गायकीचे वर्णन करा.

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

Many women poets who composed folk songs and story poems are anonymous. It is summarized from the style of these creations that majority of the work is by women. The subjects and style vouch for this. Even in the twentieth century, a number of women poets are unknown to the literary world, in spite of publication facilities. Researchers have collected information about these women and their work from their relatives and people devoted to literature.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : 4

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातही शून्य ते पाच वर्षांपर्यंतच्या मुलांच्या कुपोषणाचा प्रश्न गंभीर आहे. या बाबतीत नंदुरबार जिल्ह्याचा महाराष्ट्रात दुसरा क्रमांक लागतो. (पहिला मेळघाट) केवळ अन्नाचा अभाव हे कुपोषणाचे खरे कारण नाही. त्याची खरी कारणे अतिशय गुंतागुंतीची आहेत. अज्ञान, अंधश्रद्धा, अगतिकता यांच्या जोडीस येतात समाजातील भेदभाव, शिक्षणाचा अभाव, सामाजिक बांधीलकीचा अभाव व राजकीय औदासीन्य. पालकांचा 'बौद्धिक आळस' साऱ्यांना खतपाणी घालतो. "मी अनाडी, मले काय समजते?" हे ऐकून माझे कान किटले आहेत. समजत नसेल तर समजून घेण्याची वृत्ती हवी. प्रसारमाध्यमांनी 'कुपोषण' वेठीला बांधून स्वत:साठी त्याचा उपयोग करून घेतला आहे. या बाबतीत महाराष्ट्रात शास्त्रशुद्ध विचार झालेला नाही. वैद्यकीय प्रश्नांची पाळेमुळे सामाजिक व राजकीय परिस्थितीत असतात, ही समज स्वीकारण्याचा नकार हेच हा प्रश्न चिघळण्याचे मूळ कारण आहे. दूरदृष्टीचा पूर्ण अभाव, प्राथमिक आरोग्यसेवेचा पाया बळकट करण्याकडे दुर्लक्ष, नियोजनातील सुसूत्रतेचा अभाव आणि पोखरून टाकणारा भ्रष्टाचार यांची हातमिळवणी झाल्यानंतर वेगळे चित्र ते काय दिसणार?

———